# जिल्हा परिषद,रत्नागिरी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन

माळनाका रत्नागिरी ४१५६१२

**बांधकाम ( रत्नागिरी )विभाग**

दूरध्वनी क्र. ०२३५२-२२२२४२/२२००७६ ईमेल आय डी :- ee_wd_rtnzp@yahoo.in

जा.क्र.रजिप/ बांध./ प्रमुख आरेखक/ २१९४/२०२४ दिनांक :- १४/०३/२०२४

**प्रशासकीय मान्यता आदेश**

वाचले :- १) ग्राम विकास विभागाकडील, शासन शुध्दीपत्रक क्रमांक:झेडपीए-२०१६प्र. क्र.५६/ वित्त-९ बांधकाम भवन, २५,मर्झबान पथ,फोर्ट,मुंबई -४०० ००१,तारीख: ०६ सप्टेंबर, २०२१.

२) दिनांक ११/०३/२०२४ रोजीची मंजूर टिप्पणी.

**विषय:- लांजा तालुक्यातील गावांचे रस्त्यांचे सर्वेक्षण आणि अभ्यास करणे.**

**आदेश:-**

उन्नत महाराष्ट्र अभियान कक्ष -आयआयटी मुंबई आणि जिल्हा परिषद - रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने 'भौगोलिक माहिती अधिकारी' (Geographic Information Officer - GIO) पद कसे असावे यासाठी एकत्र काम केले जात आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील रस्त्यांचे जाळे, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत, शाळा, सार्वजनिक वाहतूक, इ. क्षेत्रांतील माहितीचे भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे एकत्रीकरण आणि नकाशांच्या रुपात सादरीकरण करणे हा एक प्रकल्प आहे. याचा उपयोग संबंधित प्रशासनाला विकासकामांच्या बाबतीत योग्य निर्णय घेण्यासाठी होईल. सदर प्रकल्पांतर्गत प्रायोगिक तत्त्वावर लांजा तालुक्यातील गावातील रस्त्यांच्या जाळ्यांचे एकत्रित माहिती संकलन केले जात आहे.

दरम्यान दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ रोजी लांजा तालुक्यातील ७६ गावातील रस्त्यांचे सर्व्हेक्षण आणि अभ्यास करण्यासाठी, जिल्हा परिषद रत्नागिरी आणि आयआयटी मुंबई - उन्नत महाराष्ट्र अभियान यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. सदर सर्वेक्षणासाठी रक्कम रु. १०,००,०००/- लक्ष इतकी तरतुद केली असून सदर खर्च, "३ अ " रस्ते बांधणे सर्व्हेक्षण साहित्य खरेदी करणे या लेखार्शिर्षा खाली खर्च टाकणेचा आहे.

तरी वरील संदर्भ क्र.२ ग्राम विकास विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक:झेडपीए-२०१६प्र. क्र.५६/ वित्त-९ बांधकाम भवन, २५,मर्झबान पथ,फोर्ट,मुंबई -४०० ००१,तारीख: ०६ सप्टेंबर, २०२१. अन्वये प्रदान केलेल्या अधिकारा नुसार रक्कम रू. ३००००१/- ते रक्कम रू. १५,००,०००/- पर्यंत प्रशासकिय मान्यता देण्याचा अधिकार, जिल्हा परिषदेचे खाते प्रमुख यांना आहेत. त्यानुसार उपरोक्त काम करणेसाठी येणारी रक्कम रु.१०,००,०००/- आहे. त्यानुसार खालीनमूद केलेल्या कामाला अटी व शर्तीना अधिन राहून प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव व स्वरूप | प्रशासकीय मान्यता रक्कम |
|---|---|---|
| १ | लांजा तालुक्यातील गावांचे रस्त्यांचे सर्वेक्षण आणि अभ्यास करणे. | १०,००,००० /- |

**अटी व शर्ती —**

१ सदर अनुदानातून प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामासाठीच खर्च करावा.

२ प्रशासकीय मान्यते पेक्षा जादा खर्च करण्यांत येऊ नये.

३ सदरचा खर्च, "३ अ " रस्ते बांधणे सर्व्हेक्षण साहित्य खरेदी करणे या लेखार्शिर्षा मध्ये करणेंत यावा.

(मानसिंग कृ. पाटील)
कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग रत्नागिरी
जिल्हा परिषद रत्नागिरी

प्रत- उप अभियंता,जि.प. बांधकाम उप विभाग, लांजा यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत- सहाय्यक लेखाधिकारी ,जि.प. बांधकाम विभाग, रत्नागिरी यांना माहितीसाठी.

प्रत- कार्यासन - बजेट , अे-९ जि.प. बांधकाम विभाग,.रत्नागिरी यांना माहितीसाठी.